IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# मनरेगा आणि व्ही बी - जी राम जी तुलनात्मक विश्लेषण

**डॉ. ज्ञानदेव क. घडलिंग**
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
(स्वायत्त)

**गोषवारा:** प्रस्तूत शोधनिबंधमध्ये "म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम – २००५" (मनरेगा) आणि "विकसित भारत – गॅरंटी फॉर रोजगार ॲन्ड आजीविका मिशन (ग्रामीण) – २०२५" (व्ही बी – जी राम जी) या दोन अधिनियमांच्या संदर्भात तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे. यामध्ये अधिनियमाची उद्दिष्टे, करण्यात आलेल्या तरतुदी, दोन्ही अधिनियमाचे वेगळेपण यासंदर्भात विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मनरेगा अधिनियमाच्या माध्यमातून मागील दोन दशकात देशाच्या ग्रामीण भागात जवळपास १० लाख कोटी रु. खर्च करण्यात आला. आतापर्यंत ग्रामीण कुटुंबांना ४.५ हजार कोटीपेक्षा जास्त श्रमदिवस रोजगार उपलब्ध झाला आहे. मनरेगातील स्रियांचा सहभाग दरवर्षी सरासरी ४८ ते ५८ टक्केच्या दरम्यान इतका राहिला आहे. कोरोना महामारीच्या काळात ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका चालविण्यात मनरेगाने महत्वाची भूमिका बजावली. मनरेगामुळे देशाच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उत्पादक परीसंपत्तीचे निर्माण तसेच सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.

डिसेंबर २०२५ मध्ये भारत सरकारने मनरेगाऐवजी व्ही बी – जी राम जी अधिनियम पारित केला. यामध्ये एका वर्षात श्रमदिवसाची किमान मर्यादा १०० वरून १२५, निधीतील राज्यांचा सहभाग, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्थानिक शेती हंगामात कामाला सुट्टी आदी तरतुदी करण्यात आल्या आहेत. या विषयी सविस्तर विश्लेषण करण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**परवलीचे शब्द:** श्रमदिवस, परीसंपत्ती, सामाजिक समता, शेती हंगाम, भ्रष्टाचार.

## प्रस्तावना:

भारतामध्ये आजही जवळपास ६८ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी ग्रामीण भागाच्या विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर देशाच्या अर्थव्यवस्थेसमोर अनेक मुलभूत समस्या होत्या यापैकी एक महत्वाची समस्या म्हणजे बेरोजगारी होय. बेरोजगारीची समस्या सोडविण्यासाठी भारत सरकारने तसेच राज्य सरकारांनी विविध रोजगार पूरक योजना व कार्यक्रम राबविले. या योजना व कार्यक्रमाच्या माध्यमातून नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत झाली. मात्र मोठ्या प्रमाणात झालेल्या लोकसंख्या वाढीमुळे देशात बेरोजगारांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. विशेषतः ग्रामीण भागात असणारी अदृश बेरोजगारी आणि हंगामी बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली आहे. याच बाबीचा विचार करून भारत सरकारने ग्रामीण भागात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने सन २००५ मध्ये "म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम" (मनरेगा) पारित केला. या अधिनियमाच्या माध्यमातून देशाच्या ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार मिळविण्याचा हमीकृत अधिकार प्राप्त झाला होता. मनरेगा अधिनियमाच्या माध्यमातून मागील दोन दशकात देशाच्या ग्रामीण भागात जवळपास १० लाख कोटी रु. खर्च करण्यात आला. आतापर्यंत ग्रामीण कुटुंबांना ४.५ हजार कोटीपेक्षा जास्त श्रमदिवस रोजगार उपलब्ध झाला आहे. मनरेगातील स्रियांचा सहभाग दरवर्षी सरासरी ४८ ते ५८ टक्केच्या दरम्यान राहिला आहे. कोरोना महामारीच्या काळात

Copyright to IJARSCT

ग्रामीण भागातील लोकांची उपजीविका चालविण्यात मनरेगाने महत्वाची भूमिका बजावली. मनरेगामुळे देशाच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर उत्पादक परीसंपत्तीचे निर्माण तसेच सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झाली. दरम्यानच्या काळात मनरेगाच्या काही उणीवा देखील समोर आल्या जसे - रोजगाराची मागणी केल्यानंतर रोजगार प्राप्त होण्यास विलंब, पूर्ण १०० श्रमदिवस रोजगार प्राप्त झालेल्या कुटुंबांचे प्रमाण अल्प, भ्रष्टाचार, राजकीय हस्तक्षेप, मानवी श्रामाऐवजी यंत्रांचा वापर, शेतीसाठी हंगामात कामगार न मिळणे आदी.

मनरेगातील उणीवा दूर करण्यासाठी आणि काही अंशी राजकीय हेतूने प्रेरित वर्तमान सरकारने डिसेंबर २०२५ मध्ये मनरेगाऐवजी व्ही बी - जी राम जी अधिनियम पारित केला. या अधिनियमात एका वर्षात श्रमदिवसाची किमान मर्यादा १०० वरून १२५, निधीतील राज्यांचा सहभाग, भ्रष्टाचार थांबविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्थानिक शेती हंगामात कामाला सुट्टी आदी तरतुदी करण्यात आल्या आहेत. याविषयी सविस्तर विश्लेषण करण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात करण्यात आला आहे.

❖ **शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये:**

प्रस्तूत शोधनिबंध खालील उद्दिष्टांवर आधारित आहे.

1. मनरेगा - २००५ चे विश्लेषण करणे.
2. व्ही बी - जी राम जी - २०२५ चे विश्लेषण करणे.
3. मनरेगा आणि व्ही बी - जी राम जी यांचे तुलनात्मक अध्ययन करणे.

❖ **शोधनिबंधाची अभ्यास पद्धती:**

प्रस्तूत शोधनिबंध पूर्णतः द्वितिय साधन सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये विविध सरकारी दस्तऐवज, संदर्भ ग्रंथ, वार्षिक अंक, अर्धवार्षिक अंक, त्रैमासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे यांचा समावेश होतो. शोधनिबंध पूर्णतः विश्लेषण पद्धतीवर आधारित आहे विश्लेषण अधिक वस्तुनिष्ठ होण्यासाठी काही प्रमाणात आकडेवारीचा आधार भेण्यात आला आहे.

❖ **मनरेगा - २००५ ची सर्वसाधारण माहिती:**

देशाच्या ग्रामीण भागातील बेरोजगारीची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने सप्टेंबर २०२५ मध्ये संसदेत नरेगा विद्येयक पारित करून त्याचे अधिनियमात रूपांतरण करण्यात आले. सुरुवातीला २००६-०७ मध्ये देशाच्या २७ राज्यांमध्ये या अधिनियमाच्या माद्यमातून निवडक मागास २०० जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर रोजगार प्रदान करण्यात आला. २००८-०९ पासून संपूर्ण ग्रामीण भारतात नारेगाच्या माद्यमातून रोजगार पुरविण्याचे काम चालू झाले. २ ऑक्टोबर २००९ गांधी जयंतीचे औचित्य साधून नरेगाला म. गांधी यांचे नाव देण्यात आले. तेंव्हापासून नरेगाला मनरेगा असे संबोधले जाऊ लागले.

❖ **मनरेगा - २००५ ची उद्दिष्ट्ये:**

ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला एका आर्थिक वर्षात 100 दिवस हमिकृत रोजगार उपलब्ध करून देणे.

रोजगाराच्या माद्यमातून ग्रामीण भागात उत्पादक परीसंपत्ती (संसाधने) निर्माण करणे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

ग्रामीण भागातील महिलांचे सबलीकरण करणे.

ग्रामीण भागातून शहरी भागात व इतर ठिकाणी होणारे स्थलांतर थांबविणे.

ग्रामीण भागात सामाजिक समता प्रस्थापित करणे. इ. प्रमुख उद्दिष्ट्ये मनरेगाची अंमलबजावणी करतांना निर्धारित करण्यात आली होती.

**मनरेगाचे यशापयश:**

मनरेगा योजना ही ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराचा अधिकार प्रदान करणारी जगातली सर्वात मोठी योजना ठरली आहे. या योजनेमुळे देशाच्या ग्रामीण भागात अनेक सकारात्मक बदल घडून आले जसे......

१. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी उपलब्ध झाली परिणामी बेरोजगारीचे प्रमाण कमी होऊन लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली.
२. रोजगारामध्ये स्त्रियांचा तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा सहभाग चांगला राहिला आहे त्यामुळे समाजातील वंचित घटकांचा विकास होण्याबरोबरच सामाजिक समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.
३. योजनेच्या माध्यमातून जी कामे हाती घेण्यात आली त्यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास होण्यास मदत झाली.
४. स्थानिक पातळीवर रोजगार प्राप्त झाल्यामुळे शहरी भागात होणारे स्थलांतर कमी झाले.

इ. सकारात्मक परिणाम असले तरी मागील २ दशकात मनरेगाच्या अंमलबजावणी दरम्यान काही उणीवा देखील समोर आल्या आहेत जसे......

१. मनरेगातील तरतुदीप्रमाणे पूर्ण १०० श्रमदिवस रोजगार मिळणाऱ्या कुटुंबांचे एकूण रोजगार प्राप्त कुटुंबांशी प्रमाण केवळ ८ ते १० टक्केच्या दरम्यान राहिले आहे.
२. लोकांपर्यंत योग्य प्रमाणात माहिती न पोहोचल्यामुळे एकूण ग्रामीण लोकासंख्येपैकी रोजगाराची मागणी करणारांचे प्रमाण अल्प राहिले आहे.
३. रोजगाराची मागणी केल्यानंतर प्रत्यक्ष काम तसेच कामाची मजुरी मिळण्याला मोठा विलंब झाला आहे.
४. शेती हंगामात मनरेगाची कामे उपलब्ध असल्यामुळे शेतीसाठी मजुरांची कमतरता जाणवली आहे.
५. बऱ्याच ठिकाणी मानवी श्रमाऐवजी यंत्रांच्या सहायाने कामे करण्यात आली आहेत.
६. रोजगार उपलब्ध करून देण्यात व कामांची निवड करण्यात स्थानिक पातळीवर राजकीय हस्तक्षेप झाला आहे.

मनरेगाच्या इत्यादी उणीवा प्रकर्षाने जाणवल्या आहेत. या उणीवा दूर करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने डिसेंबर २०२५ मध्ये मनरेगाला पर्याय म्हणून “विकसित भारत - गॅरंटी फॉर रोजगार ॲन्ड आजीविका मिशन (ग्रामीण) - २०२५” (व्ही बी - जी राम जी) अधिनियम संसदेत पारित केला.

- **व्ही बी - जी राम जी - २०२५ ची सर्वसाधारण माहिती:**

वर नमूद केल्याप्रमाणे मनरेगा अधिनियमाच्या मर्यादा आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या शतक महोस्तवी वर्षानिमित्त “विकसित भारत मिशन @२०४७” तसेच स्वावलंबी भारत आदी ध्येय नजरेसमोर ठेऊन भारत सरकारने २१ डिसेंबर २०२५ रोजी

राष्ट्रपती यांची स्वाक्षरी झाल्यानंतर “विकसित भारत - गॅरंटी फॉर रोजगार ॲन्ड आजीविका मिशन (ग्रामीण) - २०२५” (व्ही बी - जी राम जी) अधिनियम संसदेत पारित करण्यात आला.

❖ **व्ही बी - जी राम जी - २०२५ मधील महत्वाच्या तरतुदी:**

ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे, लोकांची उत्पन्न पातळी व राहणीमानाचा दर्जा सुधारणे तसेच ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी व्ही बी - जी राम जी - २०२५ अधिनियमात महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे.

१. या अधिनियमात ग्रामीण भागातील मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला एका आर्थिक वर्षात १२५ श्रमदिवस रोजगाराची हमी प्रदान करण्यार आली आहे. मनरेगाच्या तुलनेत २५ टक्के अधिक रोजगार पुरविला जाणार आहे.
२. वर्षभरात पुरविल्या जाणाऱ्या रोजगाराचे अधिक योग्य पद्धतीने नियोजन केले जाणार जसे शेतीच्या हंगामाच्या काळात ६० दिवस अधिनियाच्या कामांना सुट्टी ठेवण्यात आली जेणेकरून शेतीसाठी माजुरांचा तुटवडा जाणवणार नाही.
३. रोजगार व मजुरी प्रदान करण्यातील दिरंगाई तसेच भ्रष्टाचार रोखण्यासाठी व अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरावर भर देण्यात आला आहे. यामध्ये डिजिटल व बायोमॅट्रिक प्रणाली, जिओ टॅगिंग, एआय यांचा वापर केला जाणार आहे.
४. कामाचे नियोजन करतांना पायाभूत सुविधा, कृषी विकास, स्वावलंबन, शास्वत विकास यांचा विचार करून जल संधारण, मृदा संधारण, पूर नियंत्रण, हवामान बदलांचा प्रभाव कमी करणारी कामे हाती घेतली जाणार आहेत.
५. निधीची तरतूद करतांना राज्यांची भागीदारी (६०:४० ते ९०:१०) निश्चित केल्यामुळे अंमलबजावणीत राज्यांची जबाबदारी वाढली आहे. अंमलबजावणीत ग्रामपातळी पासून केंद्र स्थरापर्यंत अधिकार आणि कर्तव्याचे विकेंद्रीकरण केल्यामुळे सामाजिक लेखापरीक्षण/ उत्तरदायित्व वाढण्यास मदत होणार आहे.

इ. महत्वाच्या तरतुदी या अधिनियमात करण्यात आल्या आहेत.

**समारोप:**

अशाप्रकारे मनरेगा आणि व्ही बी जी राम जी या दोन अधिनियमांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता असे निदर्शनात येते की, दोन्ही अधिनियमात धोरणात्मक पातळीवर करण्यात आलेल्या तरतुदी खूप चांगल्या आहेत. अंमलबजावणीतील त्रुटीमुळे मनरेगात उणीवा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे व्ही बी जी राम जी अधिनियमाचे यश त्याच्या काटेकोर अंमलबजावणी वरच अवलंबून असेल हे निश्चित. असे झाल्यास मनरेगाने मागील दोन दशके ज्याप्रमाणे देशाच्या ग्रामीण भागात रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता निर्माण करण्यात महत्वाची भूमिका बजावली त्याचप्रमाणे व्ही बी जी राम जी अधिनियम आधुनिक काळाच्या गरजेनुसार रोजगाराची अधिक हमी, पायाभूत सुविधांचा विकास, डिजिटल पारदर्शकता आदी घटकांवर भर देऊन “विकसित भारत २०४७” च्या दिशेने वाटचाल करतांना ग्रामीण भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम, सामाजिकदृष्ट्या सुरक्षित, आणि पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ बनविण्यात महत्वाची भूमिका बजावेल असे वाटते.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 6, Issue 7, June 2026

Impact Factor: 8.2

संदर्भ सूची:

1. https://nrega.nic.in
2. https://pib.gov.in
3. https://www.niti.gov.in
4. https://rbi.org.in
5. https://mosp.gov.in

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/IJARSCT-36893